नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०४/०८/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## जबरी चोरी

१) पो.स्टे. देवलापार :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील मौजा न्यू तोतलाडोह जंगल शिवार येथे दिनांक ०३/०८/२०२२ चे १६.३० ते १७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— शैलेंद्र भरतरामजी शिवनकर, वय ४० वर्षे रा. घाटटेमरी पो.स्टे. गिरोला ता. आमगाव जि. गोंदिया ह.मु.शितलवाडी किमया हॉस्पीटल जवळ, शैलेश बाळके यांचे घरी किरायाने हे भारत फायनन्स डेली कलेक्शनचे काम करतात. त्याठिकाणी संघम मॅनेजर पदावर काम करतात. फिर्यादी हे त्यांची एमएच— ३५/एके—८८९६ क्रमांकाच्या मोटरसायकलने सिंदेवानी देवलापार येथे परिसरात कलेक्शन करण्याकरिता गेले असता न्यूतोतलाडोह पासुन अर्धा किमी अंतरावरील हायवे रोडवर पोहचण्यापुर्वी कच्चा डांबरी रोडने येत असतांना अचानक एक अज्ञात आरोपी आपले हातात दांडा घेउन जंगलातुन आला व फिर्यादीच्या डोक्यावर लाकडी दांडाने मारून जखमी करून हातातील बॅग घेऊन जंगलात पळुन गेला आहे. त्या बॅगमध्ये फिर्यादीचे फायन्सचे कलेक्शनचे २,०००००/—रू. ते २,५०,०००/—रू. व एक सॅमसॅग कंपनीचा टॅब कि. ५,०००/—रू. अशी एकुण कि. २,५५,०००/—रू. चा माल जबरीने चोरून घेउन गेला आहे. यातील फिर्यादी याला ग्रामीण रूग्णालय देवलापार येथुन सेंटर पॉईट हॉस्पीटल नागपुर येथे उपचाराकामी रेफर केल्याने येथील डॉक्टरांनी उपचार केल्याने व पेशन्टच्या बयान देण्यास सक्षम असल्याने असे अभिप्राय डॉक्टरांनी दिल्याने नमुद जखमी यांचे बयान घेऊन पोस्टे. देवलापार येथे सदर गुन्हा नोंद आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३९४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री प्रविण बोरकुटे ठाणेदार पोस्टे देवलापार हे करीत आहे.

२) पो.स्टे. मौदा :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मधुबन होटेलच्या अंदाजे १०० मिटर समोर नागपूर ते भंडारा रोड येथे दिनांक ०४/०८/२०२२ चे ०१.०० वा. ते ०१.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— निरजकुमार सत्येन्द्र सिंग, वय ३० वर्ष, रा. उतरोली ता. रेवतीपूर जि. गजीपूर (उ.प्र) हे मागील ०१ वर्षा पासुन केएमटी कंपनी गड्डाणी राजस्थान या कंपनीमध्ये ट्रक ड्रायव्हरचे काम करती असुन ते दि. ०१/०८/२०२२ ला आरजे—४७/जीए— ०८४९ क्रमांकाच्या ट्रकमध्ये लोहा सरीया लोड करून रायगढ ते पुणा जाण्याकरीता निघला होता. त्यादरम्यान त्यांचा ट्रक अलिशान ढाबा मौदाचे जवळ खराब झाला. त्यांनी दि. ०३/०८/२०२२ चे सकाळी टाटा मोटर्स सिंगोरी येथे फोन करून गाडी खराब झाल्याची माहीती दिली. तेंव्हा दुपारी ०४.०० वा. दरम्यान टाटा मोटर्स सिंगोरी येथील मेकॅनिकल आले व त्यांनी सांगितले की, 'गाडीचे इंजन मध्ये फॉल्ट झाल्याने गाडी गॅरेजला आणावी लागेल' तेव्हा फिर्यादी हे ट्रक आरामात चालवत सिंगोरी टाटा मोटर्स सिंगोरी येथे घेवुन जात असता ट्रक मधुबन हॅाटेल पासुन १०० मिटर अंतरावर बंद पडले. फिर्यादी हे रात्री ०९.०० वा. सुमारास जेवन करून ट्रकचे केबिन मध्ये झोपले असता दि. ०४/०८/२०२२ चे रात्री ०१.०० वा. ते ०१.१५ वा. सुमारास त्यांचे ट्रकचे कॅबिन मध्ये येवुन एक अज्ञात आरोपीने त्यांचे खिशातुन पॉकेट काढत असतांना जाग आल्याने तो आरोपी कंटेक्टर

साईडने उडी मारून उतरला. तेव्हा फिर्यादी सुध्दा त्याचे मागे उतरले. तेव्हा एक २५ ते ३० वर्षाचा पिवळी टि शर्ट घातलेला स्पलेंन्डर सारख्या गाडीने पळुन जात असता फिर्यादीने त्याला पकडले असता आरोपीचे दोन साथीदार आले व फिर्यादीला मारहाण करीत आसता त्यातील एका आरोपीने चाकु काढुन फिर्यादीच्या डाव्या हातावर, कमरेच्या दोन्ही साईडला, गालावर, डाव्या खांदयावर चाकुने वार केले व कमरेच्या खालच्या भागात चाकु मारून तो चाकु तसाच ठेवुन व फिर्यादी जवळील नगदी ५,०००/—रू. घेवुन मोटरसाईकलने ने भंडाराच्या दिशेने पळुन गेले. फिर्यादी तश्याच अवस्थेत मधुबन हॉटेल जवळ गेले असता तेथील लोकांनी पोलीसांना फोन करून बोलावले व फिर्यादीस ॲम्बुलन्स मध्ये मेयो हॉस्पीटल नागपुर येथे उपचाराकरीता घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीतांविरुध्द कलम ३९४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतिश सोनेकर मो.क्र ९८७५९२१७७० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर